ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख ३ फेब्रुवारी, १९६० अंक ५

## विविध माहिती

**मध्यप्रदेशांतील खताचा कारखाना**—मध्यप्रदेशांत काढण्यांत यावयाच्या खताच्या कारखान्याची जागा निश्चित करण्यासाठीं तज्ज्ञांची एक कमिटी दौऱ्यावर आहे. कमिटीनें तीन ठिकाणांची पहाणी केलेली आहे. उज्जैन शहराची निवड बहुधा करण्यांत येईल. कारखान्याच्या उभारणीसाठीं ३५ कोटी रु. खर्च येईल.

**यांत्रिक मदतीनें मच्छीमारी**—कच्छच्या किनाऱ्यावरील कोळ्यांना मार्गदर्शन करण्यासाठीं यंत्रांच्या मदतीनें मासे पकडण्याचीं प्रात्यक्षिकें करून दाखविण्याची योजना मुंबई सरकारनें आंखली आहे. मच्छीमारी करण्याच्या कोळ्यांच्या जुन्या पद्धतीपेक्षा नवी पद्धत अधिक फायद्याची आहे हें पटवून देण्याचा सरकारचा उद्देश आहे.

**पाकिस्तानांत कांद्याची आयात**—कराचींत सध्यां कांद्याचा फार तुटवडा पडला असल्यानें पाकिस्तान सरकारनें भारताकडून कांदा आयात करण्याचें ठरविलें आहे. १ लाख रु. किंमतीचा कांदा आयात करण्याचे परवाने व्यापाऱ्यांना देण्यांत आले असून त्यांच्या वांटपाची योग्य व्यवस्थाहि करून ठेवण्यांत आली आहे.

**बोलपटाच्या धंद्याचा अभ्यास**—पूर्व जर्मनींतील सिने-तंत्रज्ञांचें तीन जणांचें एक मंडळ भारतांत आलें आहे. हिंदमधील चित्रपट धंद्याच्या निरनिराळ्या केंद्रांत जाऊन ह्या धंद्यांचा अभ्यास करण्याचा त्यांचा विचार आहे. ह्या कामानिमित्त मंडळ भारत सरकारच्या चित्रपट विभागाच्या अधिकाऱ्यांच्या व धंद्यांतील उद्योगपतींच्या गांठी घेऊन वाटाघाटी करतील.

**मॉस्कोमधील प्रजासत्ताक दिन**—सोव्हिएट रशिआंत भारताचा १० वा प्रजासत्ताक दिन पुष्कळ ठिकाणीं साजरा करण्यांत आला. मॉस्कोमधील सोव्हिएट-भारत मैत्री संघातर्फे मॉस्कोमधील २०० भारतीयांचा एक मेळावा भरविण्यांत आला. मॉस्कोमधील एका नाटयगृहांत दोन प्रसिद्ध भारतीय नर्तिकांचा नाच करण्यांत आला. कार्यक्रमाला रशिअन नागरिकांनीं गर्दी केली होती.

**वॅगन्सच्या अभावामुळें नुकसान**—गेल्या वर्षी सुरत विभागांत झालेल्या पुरांत अनेक घरादारांचा नाश झाला. पूर-पीडितांना मदत म्हणून बरेचसें लाकूड सरकार कमी भावानें पुरविणार आहे. ह्यापैकी बरेचसे लाकूड सोनगड, व्यारा, नवापूर, इत्यादि रेल्वे स्टेशनांवर पडून आहे. वॅगन्स मिळत नसल्यामुळें लाकडाची खराबी होत आहे. सुमारें १३ लाख रुपयांचें लाकूड अशा रीतीनें पडून आहे.

**भारत व भूतान ह्यांना जोडणारा रस्ता**—भारत व भूतान ह्यांना जोडणाऱ्या पहिल्या रस्त्याचें काम पश्चिम बंगाल सरकारच्या देखरेखीखालीं सुरू झालें आहे. रस्त्याच्या कामासाठीं एकूण ८७ लाख रुपये खर्च येणार आहे. पश्चिम बंगाल सरकार त्यांपैकीं ५२ लाख रुपये खर्च करणार आहे. रस्ता पूर्ण होण्यास तीन वर्षें लागतील, असा अंदाज आहे.

**ज्यू विरोधी मोहीमेची माहिती**—गेल्या कांहीं दिवसांत पश्चिम जर्मनींत ज्यू विरोधाची लाट उसळली होती. ज्यू विरोधाच्या एकूण ९२ प्रकारांची सरकारकडे नोंद झालेली आहे. जर्मनीचे चॅन्सेलर ॲडनॉर ह्यांनीं ह्या घटनेचा जाहीर निषेधहि केला होता. आतां ह्या सर्व प्रकरणाची माहिती लोकांना देण्यासाठीं सरकारतर्फे एक पत्रिका प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

**अग्निबाणासाठीं नवें जळण**—पॅसिफिक महासागरावरून रशिआनें अंतराळांत सोडलेला अग्निबाण सुमारें ८०० मैल उंचीवर गेला व मग खालीं आला. त्याचा सरासरी दरताशीं वेग १८,००० मैल होता. ह्या अग्निबाणासाठीं नव्या प्रकारचें जळण वापरण्यांत आलें असावें, असा तर्क करण्यांत आला आहे. त्यामुळें इंजनाच्या बाबतींत आणखी प्रगति झाली आहे.

**अल्पबचतीला पाठिंबा**—भडोच म्युनिसिपालिटीमधील प्राथमिक शिक्षकांनीं गेल्या दोन महिन्यांत अल्पबचतीच्या रोख्यांत दहा हजार रुपये गुंतविले आहेत. श्री. चिमणलाल त्रिवेदी नांवाच्या एका शिक्षकानें तर आपला सर्व प्रॉव्हिडंट फंड म्हणजे सुमारें ४,००० रुपयांची रक्कम अल्पबचतीच्या रोख्यांत गुंतविली आहे.

**लडाख भागांत रस्त्यांची बांधणी**—लडाख व चीन ह्यामधील विस्तृत सरहद्दीपर्यंत व त्या वेड्यावांकड्या सरहद्दीला जोडण्यासाठीं रस्ते बांधण्याची मोठी योजना हातीं घेण्याचें काश्मीरच्या सरकारनें ठरविलें आहे. सुमारें ५०० मैल लांबीचे रस्ते बांधण्यांत येतील असा अंदाज आहे. त्याशिवाय कुलु खोरें व लडाख ह्यांना जोडणारा एक रस्ता बांधण्याचा भारत सरकारचा विचार आहे.

**जवळच्या रस्त्याचें आकर्षण**—भारतामधील पूर्व-रेल्वे ही बहुतेक पश्चिम बंगाल, बिहार व उत्तर प्रदेशांतून जाते. ह्या रेल्वेमार्गावर अनधिकृत ठिकाणीं मार्ग ओलांडणारे ८५० पादचारी दरवर्षी ठार होतात व ६४० जबर जखमी होतात. जवळच्या रस्त्यानें जाण्याच्या मोहाला ते बळी पडतात. त्यांपैकी बहुतेक शेतकरी, कामगार अगर विद्यार्थी असतात.

## भारताला ऑस्ट्रिआची आर्थिक मदत

भारताला ऑस्ट्रिआकडून पुढील वर्षी २ कोटी डॉलर्स अथवा ९·५ कोटी रुपयांचें कर्ज मिळणार आहे. ऑस्ट्रिआचे अर्थमंत्री डॉ. कॉमिटझ ह्याविषयासंबंधीं बोलतांना म्हणाले कीं, ह्या मदतीचा उपयोग कसा करण्यांत येतो तें पाहून पुढील चार-पांच वर्षांतहि अशीच मदत देत राहण्याचा ऑस्ट्रिआच्या सरकारचा विचार आहे. रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्याची योजना आखण्यांत आली आहे. ह्या योजनेंत ऑस्ट्रिअन तंत्रज्ञांना कांहीं भाग उचलतां येईल काय, ह्याविषयीं सध्यां अभ्यास चालू आहे. रूरकेला येथील कारखान्यांत होणारें पोलादाचें प्रत्यक्ष उत्पादन व इतर कांहीं तांत्रिक प्रक्रिया ह्यांच्या बाबतींत ऑस्ट्रिआला सहभागी होतां येईल. ऑस्ट्रियाकडून मिळणाऱ्या २ कोटी डॉलर्सच्या कर्जापैकीं कांहीं रक्कम रूरकेला येथील कारखान्याच्या विस्तारयोजनेसाठी वापरतां येईल. पण, रूरकेला कारखान्याच्या विस्ताराचें काम बरींच वर्षे चालणारें असल्यामुळें पहिल्या हप्त्यांपैकी पुष्कळशी रक्कम इतरहि कामासाठी वापरतां येण्यासारखी आहे. भारताला दीर्घकालीन मुदतीची व कमी दराच्या सारख्याच व्याजाच्या दराचीं कर्जे हवीं आहेत. त्या दृष्टीनें पहिल्या २ कोटी डॉलर्स हप्त्याच्या रकमेचा फेरविचार करण्याचा ऑस्ट्रिआच्या सरकारचा विचार आहे. ऑस्ट्रिआकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीचा भारताला उपयोग व्हावा म्हणून उभयतां देशांच्या व्यापारांत वृद्धि झाली पाहिजे हें उघडच आहे. ऑस्ट्रिआला भारताकडून मुख्यत: चहा, बिडाचें, लोखंड व कापूस ह्या वस्तूंची गरज आहे. उलटपक्षीं, भारताला यंत्रसामुग्री आणि तांत्रिक ज्ञान पुरविण्याची ऑस्ट्रिआची तयारी आहे. गेल्या वर्षी उभयतां देशांत ८० लाख डॉलर्सचा व्यापार झाला.

## भारतीय सायकलींची परदेशांत अधिकाधिक लोकप्रियता

ब्रह्मदेश, सिलोन, मलाया, अफगाणिस्तान, मोझांबिक आणि नायजेरिया या देशांत भारतीय सायकली अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्यें संपलेल्या ११ महिन्यांत या देशांकडे सुमारें ४·२ लक्ष रुपये किंमतीच्या २,८०४ पूर्ण सायकलींची निर्यात झाली. त्या पूर्वीच्या वर्षी म्हणजें १९५८ मध्यें याच कालांत अवघ्या पांच भारतीय सायकलींची निर्यात झाली होती. तसेंच १९५९ च्या अखेरीपर्यंत एकूण १·८ लक्ष रुपये किंमतीची सायकलींची अनुषंगिक सामग्री निर्यात झाली. तीन चाकी भारतीय सायकलींसाठीहि कांहीं थोड्या प्रमाणांत मागण्या येऊं लागल्या आहेत.

भारतीय सायकलींच्या निर्यातींत वाढ होण्यासाठी भारत सरकारनें कित्येक उपाय योजले आहेत. 'एक्स्पोर्ट पूल स्कीम', सायकली निर्यात बंदरांकडे पाठविण्यासाठी येणाऱ्या माल-वाहतुकीच्या भाड्यांत सूट, सायकलींच्या कारखानदारांना लोखंड आणि पोलादाच्या पुरवठ्याच्या बाबतींत अग्रक्रम देणें, आणि सवलतीच्या दरानें पुरवठा करणें, इत्यादि उपाययोजनांचा यांमध्यें अंतर्भाव होतो.

## इंदूर परस्पर सहकारी बँक लिमिटेड, इंदूर

(२०, कृष्णपुरा, लोकमान्य टिळक पथ, इंदूर)

### सुवर्णमहोत्सव

नवीन मध्यप्रदेशांत अग्रगण्य मानली जाणारी, नागरिक सहकारी संस्थांत श्रेष्ठ, अशा या संस्थेचा सुवर्ण महोत्सव दिनांक २२, २३ व २४ जानेवारी, १९६० ह्या दिवशीं श्री. वा. पुं. वर्दे, बी. कॉम., मुंबई यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. उत्सवाचें उद्घाटन व नवीन इमारतीचा कोनशिला समारंभ पंजाबचे राज्यपाल श्री. न. वि. गाडगीळ यांचे हस्त झाला.

ही संस्था गत ५० वर्षांपासून मध्यमवर्गीय लोकांची निरनिराळ्या प्रकारें सेवा करीत आहे. संस्थेचे आज २,४०० सभासद असून वसूल झालेलें भाग भांडवल २,४०,७२६ रु., निधी २,१६,२६४ रु., ठेवी २२,५८,५९१ रु. व खेळतें भांडवल २७,४५,६७१ रु. आहे.

**दादाभाई नौरोजींचें चरित्र**—भारत सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्यानें स्वातंत्र्याच्या लढ्यांतील एक थोर पुढारी दादाभाई नौरोजी ह्यांचें चरित्र प्रसिद्ध केलें आहे. 'आधुनिक भारताचे शिल्पकार' ह्या नांवानें प्रसिद्ध होणाऱ्या चरित्र-मालिकेंतील हें पहिलें चरित्र आहे. चरित्रकार श्री. अ. पी. मसानी हे असून त्यांनीं चरित्र नायकाविषयींचा अभ्यास गेलीं कित्येक वर्षे केला आहे.

**इंदूरमधील कोळशाचा तुटवडा**—इंदूरमधील कापडाच्या गिरण्यांना कोळशाचा पुरवठा व्हावा तितका होत नसल्यानें त्या बंद पडण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. जानेवारी महिन्यासाठी गिरण्यांना १०० वॅगन्स कोळसा मंजूर करण्यांत आला होता. पण, त्यांतील फक्त ९ वॅगन्स कोळसाच प्रत्यक्ष मिळाला आहे. गिरण्यांजवळ फार तर एका आठवड्याचा कोळसा शिल्लक आहे.

**सहारा वाळवंटांतील प्राचीन संस्कृति**—४५ फ्रेंच नागरिकांची एक तुकडी पूर्व सहाराच्या भागांत शास्त्रीय संशोधनासाठी गेली होती. तुकडींत पुराणवस्तुशास्त्रज्ञांचा समावेश होता. पूर्व सहारा भागांत ६,००० वर्षांपूर्वी एक प्राचीन संस्कृति उदय पावली होती व त्या ठिकाणीं त्यावेळीं नद्या व तळीं ह्यांची रेलचेल होती, असें संशोधकाच्या ह्या तुकडीस आढळून आलें.

**चीन उपग्रह सोडणार**—अग्निबाण निर्माण करण्याच्या शास्त्रांत रशिआ चीनला मदत करीत असून येत्या एक-दोन वर्षांत चीन स्वतः बनविलेला पृथ्वीचा उपग्रह अंतराळांत सोडण्याची शक्यता आहे. अग्निबाणाच्या शास्त्रांतील चिनी तज्ज्ञ अमेरिकेंतच २० वर्षे काम करीत होता. पण, १९५५ सालीं अमेरिकन सरकारनें, पूर्वी तो चिनी कम्युनिस्ट पक्षाचा सभासद होता म्हणून, त्याला सक्तीनें परत चीनला पाठविलें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# अर्थ

बुधवार, ता. ३ फेब्रुवारी, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी परदेशांची मदत

भारतामधील लोकांचें दारिद्र्य कमी करण्याच्या मार्गांतील पहिली धोंड म्हणजे लोकसंख्या व अन्नधान्याचें उत्पादन ह्यांच्यामधील तफावत ही होय. अर्थातच, अन्नधान्याच्या उत्पादनांत वाढ करण्यासाठी मध्यवर्ती व राज्य सरकारें उत्तेजक धोरण स्वीकारीत आहेत. दिल्ली येथें चालू असलेल्या जागतिक शेतकी-प्रदर्शनांत, इतर देशांनीं शेतीच्या बाबतींत केलेली प्रगति भारताच्या डोळ्यांसमोर आहेच. ह्याच संदर्भात मध्यवर्ती सरकारचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील आणि अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशनचे उपाध्यक्ष मि. हिल ह्यांच्यांत झालेल्या वाटाघाटी महत्त्वाच्या आहेत. भारतामधील कांहीं निवडक ठिकाणीं आधुनिक शेतीतंत्राच्या साह्यानें एकरीं अधिकांत अधिक पीक काढण्याची एक योजना आतां तयार होत आली असून श्री. पाटील व मि. हिल ह्यांनीं ह्याच बाबतींत चर्चा केली. हा एक महत्त्वाचा प्रयोगच आहे आणि त्याला फोर्ड फौंडेशनचा भरपूर पाठिंबा लाभला आहे. अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याच्या बाबतींत एकाच प्रकारच्या प्रयत्नांना प्राधान्य न देतां उत्पादन-वाढीला पोषक अशा सर्व उपायांचा एकदम अवलंब करण्यांत यावा असा सूर चर्चेंत दिसून आला. प्रयोगासाठीं जीं ठिकाणें निवडण्यांत येतील तेथील शेतीला पुरेसा खताचा पुरवठा करण्यांत येईल. त्याचप्रमाणें, चांगल्या प्रकारच्या बियाणांचाहि पुरवठा केला जाईल. त्याशिवाय पाणीपुरवठ्याच्या छोट्या योजना, पतीवर कर्जें मिळण्याची व्यवस्था, ह्याहि गोष्टी त्याचवेळीं करण्यांत येतील. अशा रीतीनें अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी ह्या निवडक भागांत प्रयत्नांची शिकस्त करण्यांत येईल.

आंध्र, मद्रास, मध्यप्रदेश आणि बिहार ह्या राज्यांतील एकेक जिल्हा भाताचें उत्पादन वाढविण्याच्या प्रयोगासाठी निवडण्यांत येणार आहे. पंजाब व उत्तरप्रदेश ह्या राज्यांतील एकेक जिल्हा गव्हाच्या उत्पादनवाढीच्या योजनेसाठी निवडण्यांत येणार आहे. राजस्थानमधील एका जिल्ह्याची निवड ज्वारीच्या पिकासाठी करण्यांत येणार आहे. उत्पादनवाढीच्या ह्या सर्व कार्यक्रमांत सुमारें १०० विकास गटांचा समावेश करण्यांत येईल. सर्व गटांत मिळून ५८ लाख एकर शेतजमिनीचा समावेश होईल. भारताच्या उरलेल्या राज्यांतून अशाच प्रकारचा एक उत्पादनवाढीचा कार्यक्रम पश्चिम जर्मन सरकारच्या मदतीनें अंमलांत आणला जाण्याचा संभव आहे. श्री. पाटील आणि मि. हिल ह्यांच्यामधील चर्चेत रासायनिक खतांचा पुरेसा पुरवठा होण्यावर विशेष जोर देण्यांत आला. सध्यां भारतांत सिंद्री, नांगल आणि ट्रॉम्बे ह्या ठिकाणीं रासायनिक खताचे मोठे कारखाने काढण्यांत आले आहेत अगर येणार आहेत. तथापि एकूण गरजा भागविण्यासाठी सर्व देशांत अनेक ठिकाणीं नत्रयुक्त खतांचे छोटे कारखाने विखुरण्याची श्री. पाटील ह्यांची कल्पना आहे. फोर्ड फौंडेशनचे अध्यक्ष मि. हिल ह्यांनीं अशी सूचना केली कीं, भारतामधील तज्ज्ञांच्या एखाद्या तुकडीला अमेरिका, युरोप व इतर भागांत अभ्यासासाठी पाठविण्यांत यावें. भारतांत खतांचे कारखाने काढण्यासाठी परदेशांतून भांडवल मिळण्याची शक्यता ह्या तज्ज्ञांनीं अजमावावी. कारण, अशा कारखान्यांशिवाय तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ठरविलेलें अन्नधान्याच्या उत्पादनाचें लक्ष्य गांठतां येणार नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अन्नधान्याच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ११ कोटी टन ठरविण्यांत आलें आहे.

---

## उद्योगधंद्यावरील बंधनांबद्दल असंतोष

ऑल इंडिआ कन्व्हेन्शन ऑफ बिझिनेसमेन ह्या संघटनेपुढें भाषण करतांना सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला ह्यांनीं व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्यावर नियंत्रणें लादून त्यांना साचेबंद न करण्याची विनंती सरकारला केली आहे. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, व्यापाराला व उद्योगधंद्यांना नियमनांच्या चाकोरींत बसविण्याचे प्रयत्न असेच चालू राहिले तर देशाच्या भरभराटींत व्यत्यय येईल आणि त्यामुळें लांचलुचपत व भ्रष्टाचार ह्यांना अधिकच वाव मिळेल. देशांतील सचोटी व नीतिमत्ता ह्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीनेंहि व्यापार व उद्योगधंद्यावरील बंधनें अनिष्ट ठरतात. आर्थिक दृष्टीनें तर त्यांची अनिष्टता उघडच आहे. धंदेवाइकांना अलीकडे इतक्या कायद्यांवर नजर ठेवून व्यवहार करावे लागतात कीं त्यांची गणतीच नाहीं. त्यामुळें त्यांच्यांत असमाधान पसरलेलें आहे. सरकारनें उद्योगधंद्यांवर व व्यापारावर लादलेले जबर कर कमी केले पाहिजेत. अशा प्रकारच्या जबर करामुळें आर्थिक प्रगति होत नाहीं हें दुसऱ्या देशांत मान्य करण्यांत आलेलें आहे. सोव्हिएट रशिआंत सुद्धां जबर करांचा अडथळा मान्य करण्यांत आला आहे. कांहीं काळ लोटल्यावर भारताला सुद्धां ही गोष्ट मान्य करावी लागेल. पण आज तरी भारत इतर देशांच्या मानानें ह्या बाबतींत दहा-वीस वर्षे तरी मागें आहे. ह्या बाबतींत धंदेवाल्यांनींहि विचारानें वागले पाहिजे. त्यांनीं आपल्या पुढील प्रश्नांच्या पृथकपणें विचार न करतां, देशांपुढें असणाऱ्या अनेक प्रश्नांच्या संदर्भांत त्यांचा विचार करण्यास शिकलें पाहिजे. त्यांनीं असें केल्यास, देशांतील लोक आणि सरकार त्यांच्या प्रश्नांकडे अधिक सहानुभूतीनें पहातील ह्याबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

---

**डॉ. जोसेफ ह्यांच्यासाठी मदत**—मुंबई येथील 'फ्री प्रेस' ह्या इंग्रजी दैनिकानें मध्यवर्ती सरकारचे एक दिवंगत नोकर डॉ. जोसेफ ह्यांच्या मदतीसाठी निधि काढला आहे. डॉ. जोसेफ ह्यांनीं आत्महत्त्या केली होती. ह्या निधीसाठी एका अनामिक कारकुनानें १.०५ किंमतीचीं पोस्टाचीं तिकिटें दैनिकाकडे पाठविलीं. मदत धाडतांना लिहिलेल्या पत्रांत, आपणास मध्यवर्ती सरकारच्या ७ वर्षांच्या नोकरीनंतर रु. ८५ पगार मिळत आहे असें म्हटलें आहे.

## हिंदु विवाहाच्या कायद्यावरील मध्यप्रदेश हायकोर्टाचा निवाडा

१९५५ चा हिंदु विवाहाचा कायदा अंमलांत येण्यापूर्वी अमरलाल या इसमानें विजयाबाई या स्त्रीशीं लग्न लावलें. त्यानंतर १९५७ सालीं म्हणजे हिंदु विवाहाचा कायदा अंमलांत आल्यानंतर अमरलालनें रूपवती या स्त्रीशीं दुसरें लग्न केलें. अमरलाल आणि रूपवती यांचें लग्न बेकायदा आहे असें जाहीर होण्याकरितां विजयाबाईनें अमरलाल आणि रूपवती यांचेविरुद्ध दावा आणला. छिंदवाड्याच्या ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्जानें तो दावा मंजूर करून अमरलाल आणि रूपवती यांचा विवाह बेकायदा आहे असा निकाल दिला. या निकालाविरुद्ध अमरलालनें हायकोर्टांत अपील केलें.

प्रथम पत्नी या नात्यानें १९५५ च्या हिंदु विवाहाच्या कायद्याच्या ( Hindu Marriage Act ) क. १० खालीं फक्त फारकत ( Judicial separation ) मिळूं शकते. अमरलाल आणि रूपवती यांचा विवाह बेकायदा आहे असें जाहीर करवून घेण्याकरितां हिंदु विवाहाच्या कायद्याच्या क. ११ खालीं तिला अर्ज करतां येणार नाहीं. बेकायदा लग्न ज्या दोन व्यक्तींमध्यें लागलें आहे त्या उभयतांपैकीं कुणालाहि लग्न बेकायदा आहे असें जाहीर करवून घेण्याकरितां क. ११ खालीं अर्ज करतां येईल. तें लग्न बेकायदा आहे असा अर्ज तिऱ्हाईत इसमाला करतां येणार नाहीं. लग्न बेकायदा आहे असें जाहीर करवून घेण्याकरितां जर अर्ज करावयाचा असेल तर ज्या दोघांमध्यें तें लग्न झालें आहे त्यापैकीं कुणालाहि एकाला तो अर्ज करतां येतो. तो अर्ज करण्याचा हक्क क. ११ खालीं तिऱ्हाईत इसमाला दिलेला नाहीं. अमरलाल आणि रूपवती यांचा विवाह १९५५ च्या हिंदु कायद्याच्या क. ५ शीं विसंगत असल्यामुळें बेकायदा आहे ही गोष्ट खरी. परंतु प्रस्तुत मामलयांत तो मुद्दा उपस्थित होत नाहीं. खरा मुद्दा असा आहे कीं, तो विवाह बेकायदा आहे असें जाहीर करवून घेण्याकरितां तिऱ्हाईत इसमाला क. ११ खालीं अर्ज करतां येतो काय ? क. ११ ची भाषा स्पष्ट आहे. लग्न बेकायदा आहे असा अर्ज जर क. ११ खालीं करावयाचा असेल तर तें लग्न ज्या दोघांत लागलें आहे त्यापैकीं कुणालाहि एकाला तो अर्ज करतां येतो. तिसऱ्या इसमाला तो अर्ज करतां येत नाहीं. अशा परिस्थितींत अमरलाल आणि रूपवती यांचा विवाह बेकायदा आहे असें जाहीर करवून घेण्याकरितां क. ११ खालीं विजयाबाईला अर्ज करतां येत नाहीं असा निकाल देऊन हायकोर्टानें अमरलालचें अपील मंजूर केलें.

सारांश—प्रथम पत्नी जिवंत असतांना पतीनें जर दुसरें लग्न केलें तर १९५५ च्या हिंदु विवाहाच्या कायद्याच्या ( Hindu Marriage Act ) क. १० खालीं प्रथम पत्नीला पतीपासून फारकत ( Judicial Separation ) मिळूं शकते. परंतु तें लग्न बेकायदा आहे असें जाहीर करवून घेण्याकरितां क. ११ खालीं तिला अर्ज करतां येत नाहीं. तो हक्क बेकायदा लग्न ज्या दोघांत लागलेलें आहे त्या उभयतांपैकीं कुणालाहि एकाला दिलेला आहे. तिऱ्हाईत इसमाला तो हक्क नाहीं.

**बंगलोर कॉर्पोरेशनची स्त्री-मेयॉर**—बंगलोर कॉर्पोरेशनचे मेयॉर म्हणून श्रीमती बी. इंदिराम्मा ह्यांची निवडणूक करण्यांत आली आहे. त्या ६३ वर्षे वयाच्या आहेत. बंगलोरच्या कॉर्पोरेशनची स्थापना १९४९ मध्यें झाली. तेव्हापासून मेयॉरपदाचा मान पटकावणारी ही पहिलीच स्त्री आहे.

### उद्योगधंद्यांना दिल्या जाणाऱ्या संरक्षणाचा उपयोग

इंडिअन सोप अँड टॉयलेट्रीज असोसिएशनचा रजतमहोत्सव कलकत्ता येथें साजरा करण्यांत आला. उत्सवाचें उद्घाटन मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई ह्यांच्या हस्तें झालें. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. देसाई ह्यांनीं उद्योगधंद्यांना देण्यांत येणाऱ्या संरक्षणाविषयीं आपले विचार व्यक्त केले. श्री. देसाई म्हणाले कीं, उद्योगधंद्यांना दिलें जाणारें संरक्षण नेहमींच उपयोगी ठरतें असें नाहीं. त्याचा परिणाम पुष्कळदां असा होतो कीं, कारखानदार चांगला माल निर्माण करण्याचे प्रयत्न चालू ठेवीत नाहींत; शिवाय चांगला माल काढला तर त्याकडे दुर्लक्ष होतें तें वेगळेंच. म्हणून कारखानदारांनीं आपल्या मालाचा दर्जा चांगला राखण्यावर अधिक जोर देणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें उत्पादनाचा खर्चहि आर्थिकदृष्ट्या परवडणारा असा राखला गेला पाहिजे. ह्या दोन गोष्टी साधल्या तरच उद्योगधंद्यांची भरभराट होऊं शकेल. वाजवी स्पर्धा ही कोणत्याहि धंद्याला नेहमींच उपकारक ठरते. साबणाच्या बनावटींत कारखानदारांनीं भपकारा येईल अशा प्रकारचीं वास देणारीं द्रव्यें वापरूं नयेत. अशा द्रव्यांनीं प्रथम गिऱ्हाईक आकर्षित होईल हें खरें. पण, अखेर त्यामुळें साबणाची प्रत घसरते. साबणाच्या जाहिरातींत पुष्कळदां अमुकच साबण सर्वोत्कृष्ट आहे असा जोराचा प्रचार केलेला असतो. त्याच्यावर विसंबून गिऱ्हाईकें तो घेतात. पण, नंतर त्यांना प्रचारांतील लबाडी समजून येते. म्हणून जाहिरातदारांनीं आपल्या जाहिरातींत खऱ्या वस्तुस्थितीची कल्पना द्यावी. त्यामुळें ग्राहकांचा फायदा होईल. श्रीमती गोद्रेज ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत साबणाच्या खपाला भारतांत अजून भरपूर वाव आहे असें सांगितलें.

**डेनमार्ककडून मदत**—अणुविज्ञानाच्या क्षेत्रांत संशोधन करण्याच्या कामीं डेनमार्क भारताला मदत करील असें आश्वासन सुप्रसिद्ध डॅनिश अणुशास्त्रज्ञ डॉ. नील्स बॉर ह्यांनीं दिलें आहे. डेनमार्कमधील अणुविज्ञानाच्या ज्या उच्च संस्था आहेत, त्यांमधून हिंदी शास्त्रज्ञांनीं शिक्षण देण्याच्या रूपानें वरील मदत मिळणार आहे.

**आर्थिक बहिष्काराचें राजकीय कारण**—येत्या मार्च महिन्यापासून दक्षिण आफ्रिकेच्या मालावर कामगारांनीं बहिष्कार टाकावा असें आवाहन ब्रिटिश मजूर संघटनेनें आपल्या सदस्यांना केलें आहे. दक्षिण आफ्रिकन सरकार काळ्या वर्णाच्या लोकांना जी हृदयशून्य वागणूक देत आहे, त्याच्या निषेधार्थ हें हत्यार उपसण्यांत यावयाचें आहे.

**राधाकृष्ण चित्रपटाला बक्षीस**—दक्षिण अमेरिकेंतील चिली विद्यापीठानें आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव भरविला होता. ह्या महोत्सवांत भारतांत तयार करण्यांत आलेल्या 'राधाकृष्ण' ह्या चित्रपटाला पहिलें बक्षीस देण्यांत आलें. एक उत्कृष्ट कलाविषयक अनुबोधपट म्हणून सदर चित्रपटाला हा मान मिळाला आहे.

**कुवाइतच्या सुलतानाची देणगी**—विदर्भ आणि खानदेश जिल्ह्यांत गेल्या वर्षी महापूर येऊन खूप वित्तहानी झाली. ह्या आपत्तींत सांपडलेल्यांना मदत म्हणून कुवाइतच्या सुलतानानें ५०,००० रुपयांची देणगी मुंबई राज्य सरकारकडे पाठविली आहे. ह्याशिवाय मुंबईतील आणखी कांहीं सार्वजनिक संस्थांना १,५०,००० रु. त्यांच्याकडून आले आहेत.

## भारतांतील मशीन टूल धंद्याचा विकास

आधुनिक पद्धतीचें राहणीमान ठेवण्यासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंच्या आणि सेवा-साधनांच्या उत्पादनांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें मशीन टूल्सचा हातभार लागलेला असतो. वाहतुकीच्या आणि दळणवळणाच्या साधनांसारख्या अत्यावश्यक साधनांच्या निर्मितींतहि त्यांचा प्रत्यक्षपणें वापर केला जातो. मशीन टूल्स म्हणजे यंत्रें बनविणारीं यंत्रें. दररोजच्या वापरांतील सर्व वस्तूंचें उत्पादन अप्रत्यक्षपणें त्यावरच अवलंबून असतें. साहजिकच कोणत्याहि राष्ट्रांत तीं तयार करण्याच्या कार्यास विशेष प्राधान्य देण्यांत येतें. प्रगत राष्ट्रेंहि त्यास अपवाद नाहींत.

### मशीन टूल धंद्याचा भारतांतील विकास

भारतांत मशीन टूल निर्मितीचा धंदा दुसऱ्या महायुद्धापूर्वी जवळजवळ नव्हताच आणि युद्धपूर्व काळांत प्रतिवर्षी २ कोटी रु. किंमतीचीं मशीन टूल्स आयात करण्यांत येत. कांहीं अगदीं मोजक्या फर्म अगदीं साध्या यंत्रांची निर्मिति करीत पण एकाहि फर्मकडून दरमहा दोनतीन यंत्रांपलीकडे उत्पादन होत नसे. तथापि दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत या यंत्रांची आयात करणें कठीण होऊन बसल्यानें सरकारचें लक्ष या धंद्याकडे गेलें. सरकारच्या सक्रीय साह्यामुळें युद्धकाळांत मशीन टूल्सच्या उत्पादनांत भरपूर वाढ झाली. १९४२ मध्यें अशी १,८०० मशीन्स तयार झालीं होतीं. या उत्पादनांत वाढ होत होत १९४५ मध्यें तें १,१००० मशीनवर गेलें व त्यांची किंमत १ कोटी ६० लक्ष रु. होती. सप्टेंबर, १९३९ ते सप्टेंबर, १९४५ या युद्धकाळांतील सहा वर्षांत भारतांत सुमारें ६ कोटी रु. किंमतीचीं अंदाजें २०,००० मशीन टूल्स तयार झालीं.

उत्पादनाच्या बाबतींत इतकी प्रगति होऊनहि, तयार होणारीं यंत्रें अत्यंत साधीं आणि जुन्या नमुन्यांचीं होतीं. अर्थात् हीं यंत्रें छोट्या उद्योगधंद्यांस उपयुक्त होतीं. तथापि रेल्वेची वर्कशॉप, ऑर्डनन्स फॅक्टऱ्या व इतर कांहीं प्रमुख उद्योगधंदे यांत त्यांचा उपयोग होत नसे.

### प्रगतीसाठीं प्रयत्न

या धंद्याची वाढ करण्याच्या प्रश्नाकडे मशीन टूल समितीचें लक्ष गेलें. या समितीनें सदर धंद्यांतील अंगभूत प्रश्नांचें व संभाव्य विस्ताराचें विश्लेषण करून १९४७-४८ साठी ७,३२५ (प्रतवारी केलेल्या व न केलेल्या) मशीन टूल्सचें उत्पादन करण्याची आणि त्यांत प्रतिवर्षी २० टक्क्यांनीं वाढ करीत जाऊन मार्च, १९५३ पर्यंत तें दुप्पट करण्याची शिफारस केली. अर्थात्, भारत अखंड असतांना उत्पादनाबाबत केलेली ही शिफारस फाळणीनंतर कांहींशी बदलावी लागली.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत १९५२-५३ पर्यंत २,१७० (सुमारें ६५ लक्ष रु. किंमतीची) आणि १९५५-५६ पर्यंत ३,३०० मशीन टूल्स (१ कोटी रु. किंमतीची) तयार करण्याचें लक्ष्य ठरविण्यांत आलें होतें. पुढील योजनांत खूप प्रगति करतां यावी म्हणून उपलब्ध धंद्याचा पाया भक्कम करण्याचें व इतर प्राथमिक स्वरूपाचें कार्य करण्याचेंच उद्दिष्ट पहिल्या योजनेंत उद्योगधंद्यांबाबत ठेवण्यांत आलें असल्यानें या नवीन धंद्याचा उद्योगधंद्यावर किती दूरगामी परिणाम होणार आहे ही गोष्ट लक्षांत आली नाहीं. आणि हेंहि खरें कीं, १९५५-५६ पर्यंत या धंद्यांतील उत्पादन माफक प्रमाणावर होत होतें.

### हिंदुस्थान मशिन टूल्स : महत्त्वाचा टप्पा

बंगलूरजवळ जलहळ्ळी येथें हिंदुस्थान मशीन टूल्स या नांवाच्या यंत्रें बनविणाऱ्या अत्याधुनिक सूक्ष्म यंत्रांच्या पहिल्या कारखान्याची स्थापना म्हणजे स्वतंत्र भारताच्या औद्योगिक विकासांतील तसेंच सरकारी क्षेत्रांतील अवजड उद्योगधंद्यांच्या विस्तारांतील अत्यंत महत्वाचा टप्पा होय. एरवी आयात करावीं लागलीं असतीं अशा कांहीं सूक्ष्म मशीन टूल्सचें देशांत उत्पादन करणारा कारखाना म्हणूनच नव्हे, तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत संकल्पिलेल्या नव्या मशीन टूल्स कारखान्यांचें आद्य ठिकाण, या दृष्टीनेंहि त्यास कामगिरी बजवावयाची आहे.

### उत्पादनांत विविधता

भारतांतील मशीन टूल्स धंद्याच्या प्रगतीचा इतिहास म्हणजे सदर कारखान्याच्या कार्याचाच इतिहास म्हणावा लागेल. ठरविलेल्या वेळापत्रकापेक्षा हा कारखाना प्रत्यक्ष सुरू करण्यास विलंब लागला खरा; तथापि मे, १९५६ पासून केलेल्या कामगिरीनें तो भरून काढला आहे. उत्पादनांत विविधता, अनेक पाळ्या चालू करणें, कामास चालना देण्यासाठी बोनसची पद्धति, तांत्रिक विक्रीवाढ योजना व विकासाचे प्रयत्न यांसारखीं खासगी क्षेत्रांतील यशस्वी कारखानदार सामान्यतः अवलंबितात तीं तंत्रें व पद्धति हाताळून या कंपनीनें आपल्या उत्पादनांत व विक्रींत वाढ केली, विक्रीच्या किंमती कमी केल्या आणि हळूहळू आपल्या आर्थिक व्यवहारांतहि प्रगति साधली आहे. या कारखान्यानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून (१९५६-५७) उत्पादन १३५ यंत्रांवरून वाढवून १९५९-६० मध्यें ७०० (अंदाजें) वर नेलें आहे. या वाढीबरोबरच निरनिराळ्या प्रकारच्या टूल्सचीहि निर्मिति या कारखान्यांत होऊं लागली. १९५६-५७ मध्यें या कारखान्यांत फक्त ओअर लिंकन लेथचें काय तें उत्पादन होई; १९५७-५८ मध्यें तेथें सहा प्रकारच्या गिरणी (मिलिंग) यंत्रांचें व दहा प्रकारच्या रॅडियल ड्रिल्सचें उत्पादन होऊं लागलें आणि १९५८-५९ मध्यें त्याच्या जोडीस ४४ प्रकारचे बॅटिग्नोलस पद्धतीचे लेथहि बनूं लागले. माफक किंमतींत ओतीव लोखंड पैदा करणें ही कारखान्याच्या उत्पादन वाढींतील एक प्रमुख अडचण होती, म्हणून ६० लक्ष रुपये खर्चून या कारखान्यानें ओतशाळा काढली. आपल्या यंत्रांच्या विक्रीच्या किंमतींत या कारखान्यानें पुढीलप्रमाणें कपात केली. हिंदुस्थान लेथ मूळ किंमत ३६,००० रु. १ जून, १९५७ रोजीं, ती ३,००० रुपयांनीं आणि १ जून, १९५८ रोजीं ३,५०० रु. नी कमी करण्यांत आली. इतरहि कांहीं यंत्रांच्या किंमतींत क्रमशः अशीच कपात करण्यांत आली.

मार्च १९५६ पासून ह्या कारखान्याच्या एकूण निव्वळ स्थायी मालमत्तेंत वाढ होत असून २.८२ कोटींवरून ३१ मार्च १९५९ रोजीं ती ३.९३ कोटी रुपयांवर गेली. गेल्या तीन वर्षांत ह्या कारखान्यानें संपादन केलेलें यश आणि भविष्यकाळांतील परिस्थिति विचारांत घेऊन १९६०-६१ मधील आपल्या यंत्रांच्या उत्पादनांत वाढ करून तिसऱ्या योजनेच्या अखेरच्या वर्षांत २,००० यंत्रांवर नेण्यासाठी आंखलेल्या योजना या कारखान्यानें पक्क्या केल्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खाणकाम, वीज आणि वाहतूक या धंद्यांस चालना मिळाल्यामुळें मशीन टूल्सच्या मागणीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या परिणाम होऊन ती मोठ्या प्रमाणांत वाढूं लागली. अर्थात् ही मागणी पुरी करण्यासाठी १९५४ मध्यें ३.८६ कोटी रुपये किंमतीची, १९५५ मध्यें ५.२९ कोटी रुपये किंमतीची, १९५६ मध्यें

८·३७ कोटी रु. किंमतीची, १९५७ मध्यें १४·६४ कोटी रुपये किंमतीची, १९५८ मध्यें १५·३१ कोटी रुपये किंमतीची व १९५९ मध्यें (जानेवारी ते ऑक्टोबर) ८·५६ कोटी रुपये किंमतीचीं मशीन टूल्स आयात करावीं लागलीं.

### भविष्यकाळासाठी योजना

मशीन टूल्सच्या मागणींत झालेली वाढ व परकीय चलनाचा तुटवडा यामुळें देशांतच मशीन टूल्सचें उत्पादन करण्याकडे खाजगी उद्योगपतींचें लक्ष वळूं लागलें आहे. यासंबंधींच्या कित्येक योजनांसाठी अलीकडच्या कांहीं काळांत परवाने देण्यांत आले आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या संदर्भांत या धंद्याचा किती विकास करावा लागेल याबाबतचा अभ्यास गेल्या वर्षापासून करण्यांत येत आहे. किंमतीच्या प्रमाणांत विचार करतां १९६५–६६ पर्यंत या धंद्यासाठी दरवर्षी ३० कोटी रुपये किंमतीच्या मशीन टूल्सच्या उत्पादनाचें लक्ष्य ठेवण्याची जरूरी असल्याचा अंदाज आहे.

या धंद्याच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी, किमानपक्षी सरकारी मालकीचे मशीन टूल्सचे कारखाने भक्कम पायावर उभारण्याच्या योजनांचा अभ्यास एका कार्यक्षम तांत्रिक मंडळाला करणें जरूर आहे, असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. औद्योगिकरण आणि आर्थिक विकास झपाट्यानें करण्यासाठी मशीन टूल्सच्या धंद्याला विशेष महत्त्व आहे. या बाबतींत सर्व साधारणपणें दुमत नाहीं. तसेंच, या धंद्यांत भांडवलाचा ओघ वळवावा व त्याच्या विकासासाठी प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत ह्या बाबतींतहि एकवाक्यता आहे. सरकारी आणि खासगी या दोन्हीं क्षेत्रांना ही जबाबदारी उचलावयाची आहे; आणि म्हणून पुरेशा प्रमाणांत आणि झपाट्यानें प्रगति होण्यासाठी ह्या दोन्ही क्षेत्रांतील कार्य आणि कार्यक्रम यांच्यांत योग्य ती सांगड घातली गेली पाहिजे, त्यांमध्यें सुसूत्रता असली पाहिजे. अशा प्रकारची सांगड घालण्यासाठी आणि सुसूत्रता साधण्यासाठी मध्यवर्ती व्यापार आणि उद्योगखात्याच्या अखत्यारीखालील मशीन टूल्स विकास मंडळाचें बहुमोल साह्य होईल.

---

### १९५९ मध्यें कापड उत्पादनांत दहा कोटी वारांची वाढ

सुती कापडाचें उत्पादन १९५९ मध्यें सुमारें १० कोटी वारांनीं वाढलें आहे. हातमागांवर व वीजमागांवर काढलेल्या कापडासुद्धां या वर्षांत सुती कापडधंद्यांत एकूण ७१५·३ कोटी वार कापड तयार झालें. १९५८ चा हा आंकडा ७०५·६ कोटी वार असा होता. १९५९ मधील या उत्पादनापैकी हातमाग व वीजमाग क्षेत्रांत २२२·८ कोटी वार, तर सुती कापड गिरण्यांत ४९२·५ कोटी वार कापड तयार झालें.

या वर्षांत तयार झालेल्या १७२·१ कोटी रत्तल सुतापैकी ५५ कोटी रत्तल सूत हातमाग, वीजमाग, हॉझिअरी व इतर कारखान्यांनीं वापरलें. या धंद्यांत दरमहा सरासरी सुमारें ४·६ कोटी रत्तल सुताचा पुरवठा करण्यांत आला.

डिसेंबर १९५९ मध्यें कापड गिरण्यांत १५·२ कोटी रत्तल सूत व ४३·४ कोटी वार कापड तयार झालें. या महिन्याअखेर सदर गिरण्यांकडे विकल्या गेलेल्या परंतु खरेदीदारांनीं उठाव न केलेल्या १·५६ लाख गांसड्या व विकल्या न गेलेल्या १·१३ लाख गांसड्या मिळून एकूण २·७४ लाख गांसड्या कापड शिल्लक होतें.

## गेल्या दहा वर्षांतील औद्योगिक विकास

राष्ट्रीय सामर्थ्याच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक अशा अवजड उद्योगधंद्यांच्या विकासाचा घातला गेलेला भक्कम पाया ही गेल्या दहा वर्षांतील सर्वांत महत्त्वाची कामगिरी होय.

कोठल्याहि आर्थिक व्यवस्थेंत अवजड उद्योगधंद्यांचें यश अवजड इंजिनिअरिंग धंदे व मूलभूत रासायनिक धंदे यांच्या समतोल विकासावरच अवलंबून असतें आणि म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खाजगी व सरकारी क्षेत्रांतील सुसूत्र प्रयत्नांद्वारें पोलाद धंद्याचा मोठ्या प्रमाणावर विकास करण्यावर भर देण्याबरोबरच यंत्रे तयार करण्याच्या व रासायनिक धंद्यांच्या विकासाचीहि तरतूद करण्यांत आली आहे.

### दहा वर्षांतील प्रगति

अवजड उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत सध्यां भारतांत १३ लाख टन तयार पोलाद, १२,००० वाफिणी व त्यांच्या चौकटी, साखर गिरण्यांस लागणारी २·५ कोटी रु. किंमतीची यंत्रसामुग्री, ३ कोटी रु. किंमतीची सिमेंट, रसायन, बांधकाम व शेतकी धंद्यांत लागणारी यंत्रसामुग्री, ४ कोटी रु. किंमतीची मशीन टूल्स, ३०,००० डिझेल इंजिनें, २४,००० मोटार गाड्या, २० लाख बॉल–बेअरिंग्ज, इलेक्ट्रिक मोटर्स (एकूण शक्ति ६ लाख हॉर्स पॉवर), एकूण १० लाख केव्हीएचे पॉवर ट्रॅन्सफॉर्मर्स, इत्यादींचें उत्पादन होत आहे. सध्यां देशांत दर वर्षी सुमारें १२० कोटी रुपये किंमतीची औद्योगिक यंत्रसामुग्री तयार होत आहे. पांच वर्षांपूर्वी हा आंकडा १० कोटी रु.हूनहि कमीच होता. सरकारी मालकीच्या तीन पोलाद कारखान्यांतून अधिक प्रमाणांत पोलाद मिळूं लागल्यावर या धंद्यांतील उत्पादनांतहि बरीच वाढ होईल.

धातुधंद्यांचा विचार करतां सध्यां, भारतांत १६,००० टन ॲल्युमिनिअम, ७,००० टन तांबें, १६,००० टन लोहयुक्त मँगेनीज, तसेंच कांहीं प्रमाणांत जस्त, शिसें व ॲंटिमनी या धातूंचें उत्पादन होत आहे. त्याचप्रमाणें अवजड रसायनांपैकी कॉस्टिक सोडा ॲश, सल्फ्यूरिक ॲसिड, सिमेंट, या धंद्यांची उत्पादनशक्तिहि वाढत असून हायड्रोजन पेरॉक्सॉइड, औद्योगिक व खाणकाम धंद्यांत वापरलीं जाणारीं स्फोटक द्रव्यें, अमोनिअम नायट्रेट, ॲसिटोन, यांसारख्या नव्या क्षेत्रांतहि उत्पादनास सुरुवात झाली आहे.

### पुढील तीन वर्षांतील उत्पादनाचा कार्यक्रम

पुढील तीन वर्षांत भोपाळ येथील अवजड विद्युत् यंत्रसामग्रीचा कारखाना, रांची येथील अवजड यंत्रसामग्री तयार करण्याचा व अवजड फाऊंड्री फोर्जे कारखाना, दुर्गापूर येथील कोळशाच्या खाणीसाठीं लागणारीं यंत्रसामग्री तयार करणारा कारखाना व बंगलूर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्यांतील संकल्पित फाऊंड्री या योजना पूर्णावस्थेस गेल्यानंतर आपल्या अवजड उद्योगधंद्यांच्या उत्पादनशक्तींत बरीच वाढ होईल. भोपाळ येथील कारखान्यांत या वर्षाच्या मध्यास उत्पादनास प्रारंभ होण्याची अपेक्षा असून १९६३–६४ पर्यंत येथें सुमारें साडेबारा कोटी रुपये किंमतीचें उत्पादन होईल. रांची येथील कारखान्यांत १९६३ मध्यें उत्पादनास सुरुवात होणार असून त्याची उत्पादनशक्ति ४५,००० टन आहे. दुर्गापूर येथील कारखानाहि याच वर्षी सुरू होत असून त्याची उत्पादनशक्ति दरवर्षी ३०,००० टन असेल.

### खाजगी क्षेत्रांतील प्रगति

खाजगी धंद्यांच्या क्षेत्रांतहि झपाट्यानें प्रगति होत आहे. साखर कारखाना, कापड व रासायनिक धंद्यांस लागणाऱ्या यंत्रसामग्रीच्या उत्पादनांत झपाट्यानें वाढ होत आहे. चालू वर्षांत ट्रॅन्सफॉर्मर्स, स्ट्रक्चर्स व स्टील कास्टिंग्ज यांसारख्या अनेक वस्तूंची उत्पादनशक्ति बरीच वाढणार असून ॲन्युमिनिअम, जस्त व शिसें यांचें उत्पादन दरवर्षी अनुक्रमें ९०,००० टन, १५,००० टन व ८,००० टनांपर्यंत जाण्यासाठी नवे कारखाने स्थापन होत आहेत. त्याप्रमाणें परकीय फर्म्सच्या साह्यानें कागद, खतें, रसायनें, इत्यादींचें उत्पादनहि पुढील दोन-तीन वर्षांत चालू करण्यांत येईल.

### भावी विकासाचा कार्यक्रम

देशांतील अवजड उद्योगधंद्यांचा झपाट्यानें विकास करण्यासाठी महत्त्वाचे असे अनेक विकास कार्यक्रम आंखण्यांत आले आहेत. तदनुसार रांची येथील अवजड यंत्र उभारणी कारखान्यांचे उत्पादन दरवर्षी दुप्पटीनें वाढवून ८०,००० टनांपर्यंत नेण्याचा विचार आहे. भोपाळ येथील कारखान्यांत चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला प्रतिवर्षी ५० कोटी रु. किंमतीची यंत्रसामग्री तयार करणारा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे, तर या कार्यक्रमानुसार दुर्गापूर येथील कोळसा खाण यंत्रसामग्रीचें उत्पादन दुप्पटीनें वाढणार आहे. त्याशिवाय तेथें तेल उत्खननासाठी लागणारी यंत्रसामग्रीहि तयार होईल. हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याचें उत्पादनहि १९६२ च्या बेतास दुप्पटीनें वाढेल. याशिवाय कांहीं परदेशांच्या सहकार्यानें देशांतील अवजड उद्योगधंद्यांच्या विकासाकरितां सरकार अनेक योजनांचा विचार करीत आहे.

---

**दुर्मिळ वनस्पतीचा शोध**—सिक्किमच्या राज्यांतील कांहीं दुर्मिळ वनस्पतींचा शोध करण्याचें काम जपानी व हिंदी वनस्पतिशास्त्रज्ञ सहकार्यानें करणार आहेत. हिंदी-जपानी वनस्पतिशास्त्रज्ञांची एक तुकडी ह्या कामासाठी सिक्किमला जाणार आहे. येत्या मार्च महिन्यांत चार जपानी वनस्पतिशास्त्रज्ञ तुकडींत सामील होण्यासाठी भारतांत येतील.

**रांची येथील कारखान्याची यंत्रसामुग्री**—बिहार राज्यांत रांची येथें रशिआच्या मदतीनें उभारण्यांत येणाऱ्या भारी यंत्रसामुग्रीच्या कारखान्यासाठी रशिआ विजेच्या ८ यान्या पुरविणार आहे. ह्या यान्या वर टांगलेल्या तारांच्या साह्यानें मागेंपुढें सरकतील. ३० टनांपासून १०० टनांपर्यंत वजन उचलण्याची त्यांची शक्ति आहे.

**दुर्गापूर कारखान्यासाठी एंजिनिअर्स**—दुर्गापूर येथें ब्रिटनच्या मदतीनें उभारण्यांत येत असलेल्या पोलादाच्या कारखान्यांत काम करण्यासाठी आणखी ३३ हिंदी एंजिनिअर्सना शिक्षण देण्यांत येणार आहे. ही तुकडी नुकतीच ब्रिटनला रवाना झाली. दुर्गापूर येथील कारखान्यांत काम करण्यासाठी एकूण ३५० एंजिनिअर्स लागतील.

**मॉस्कोंतील प्रजासत्ताक दिन**—भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीं मॉस्कोमध्यें १९ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास बंगालमध्यें आलेल्या एका रशिअन नाटककाराच्या जीवनावर आधारलेलें नाटक करण्यांत आलें. बंगाली नाट्यवाङ्मयाला त्यानें त्यावेळीं महत्त्वाचें वळण लावलें, असें इतिहासज्ञांचें म्हणणें आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

### शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

एस्. ए. कुलकर्णी
मॅनेजर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

### हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## "वैद्यराज, आपली प्रकृति आधी सुधारा"

सरकारी हॉस्पिटलें 'इंडस्ट्री' च्या व्याख्येंत येतात

मुंबई सरकारनें चालविलेल्या, जे. जे. हॉस्पिटल्स गटांतील दोन कामगारांना कपातीबद्दल नुकसानभरपाई न देतां कामावरून काढून टाकले, तें बेकायदा आहे असा निवाडा मुंबई हायकोर्टानें दिला होता. त्यावर मुंबई सरकारनें सुप्रीम कोर्टाकडे अपील केलें. लोकांच्या कल्याणासाठी चालू असलेली इस्पितळाची सरकारी संस्थासुद्धां इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स् अॅक्टाच्या कलम २ (जे) ह्या सदरांत येते; म्हणून कायद्यांतील इतर तरतुदीहि (कपातीबद्दल नुकसानभरपाई देणारें २५ एफ कलमसुद्धां) त्यास लागू होतात, असें सुप्रीम कोर्टानें आपलें मत व्यक्त केलें आहे. "देशाच्या हितास पोषक अशा सरकारी सामाजिक-आर्थिक उपक्रमास हा कायदा लागू असूं नये, हें सरकारचें म्हणणें विसंगत दिसतें," असें सुप्रीम कोर्टानें म्हटलें आहे.

---

### अहमदाबाद बोनस कराराची मुदतवाढ

टेक्सटाईल लेबर असोसिएशन, अहमदाबाद आणि अहमदाबाद मिल-ओनर्स असोसिएशन ह्यांचेमधील बोनसबाबत १९५३-५७ ह्या पंचवार्षिक कराराची मुदत मुंबईच्या इंडस्ट्रिअल कोर्टानें एका वर्षानें वाढविली आहे. किमान १५ दिवसांच्या पगाराइतका आणि कमाल तीन महिन्यांच्या पगाराइतका बोनस १,२५,००० कामगारांना ह्या करारान्वयें मिळतो. ह्या कराराची मुदत वाढविली गेल्यामुळें १९५८ सालाकरितां त्यांना एक कोटि रुपये मिळतील. कामगारसंघ आणि गिरणीमालकसंघ ह्यांनीं, सहा आठवड्यांच्या आंत, प्रत्येक गिरणीनें द्याव्या लागणाऱ्या बोनसचा हिशेब सादर करावयाचा आहे. त्यानंतर बोनसची पक्की रक्कम इंडस्ट्रिअल कोर्ट निश्चित करील. कराराच्या मुदतवाढीला गिरणीमालकसंघाचा विरोध होता.

---

### श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

बँकेच्या शिवाजी उद्यमनगर शाखेचें उद्घाटन सोमवार दिनांक १-२-६० रोजीं सकाळीं ठीक ९॥ वाजतां दि कोल्हापूर शुगर मिल्स लि., कोल्हापूरचे जनरल मॅनेजर श्रीमान् शेठ एस्. बी. लोहीया यांचे अध्यक्षतेखालीं सुप्रसिद्ध उद्योगपती श्रीमान् शेठ रामभाई सामाणी यांचे हस्तें झालें.

---

### रिझर्व्ह बँकेची मद्रास येथील इमारत

रिझर्व्ह बँकेच्या मद्रास येथील नव्या इमारतीचें उद्घाटन दि. २५ जानेवारी रोजीं मद्रासचे मुख्य मंत्री श्री. कामराज ह्यांच्या हस्तें झालें. त्यावेळीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. अय्यंगार ह्यांनीं, रिझर्व्ह बँकेला देशांतील वेगवेगळ्या प्रदेशांच्या गरजांचा अभ्यास करण्यास आणि धोरण आखण्यास तिच्या शाखांचा कसा उपयोग होतो, तें सांगितलें.

---

### रिझर्व्ह बँकेचे नवे डेप्युटि गव्हर्नर

श्री. के. जी. आंबेगांवकर हे रिझर्व्ह बँकेतून १ मार्च, १९६० रोजीं निवृत्त होत आहेत. त्यांचे जागीं श्री. एम्. व्ही. रंगाचारी ह्यांची पांच वर्षांसाठी डेप्युटि गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली आहे. मध्यवर्ती सरकारच्या अर्थखात्यांतील इकॉनॉमिक अफेअर्स विभागांत सध्यां ते स्पेशल सेक्रेटरी आहेत.

**भिलईच्या कारखान्याचा विस्तार**— मध्यप्रदेशांत रशिआच्या मदतीनें उभारण्यांत आलेल्या भिलई येथील पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यांत येणार आहे. सध्यां कारखान्याच्या सर्व भट्ट्या चालू झालेल्या नाहींत. १९६० च्या अखेरीस तिन्ही भट्ट्या चालू झाल्यावर दरसाल १५ लाख टन पोलाद तयार होईल. विस्ताराची योजना पूर्ण झाल्यावर २५ लाख टन पोलाद तयार होऊं लागेल.

**साखरेच्या टंचाईचा परिणाम**—सुरत म्युनिसिपालिटी २६ जानेवारी ह्या प्रजासत्ताकदिनीं शाळेंतील मुलांना खाऊ वाटण्यासाठी ५,००० रुपये खर्च करणार होती. पण साखरेच्या टंचाईमुळें हा कार्यक्रम सोडून द्यावा लागला. आतां ह्याच रकमेचा उपयोग करून शहरांतील प्राथमिक शाळांच्या ग्रंथालयांत नव्या पुस्तकांची भर घालण्यांत येणार आहे.

**चतुर चोरांची करामत**—पश्चिम जर्मनींतील गॉथेनबर्ग ह्या शहरांत चोरीपासून बचाव करण्याचे उपाय सुचविणारें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनाला 'चोऱ्या थांबवा' असें नांव देण्यांत आलें होतें. पण ह्याच प्रदर्शनाला कांहीं बिलंदर चोरांनीं भेट दिली व चोरांना दाद न देणारीं ६ कुलुपें लांबविलीं.

---

## Government Diploma in Co-operation and Accountancy Examination Results

The under-mentioned candidates have been declared by the Co-operation and Accountancy Diploma Board to have passed the Government Diploma in Co-operation and Accountancy Examination held in November 1959, at Poona.

Passed in the whole Examination including those who have passed in one or the other part previously

1st Class : Nil.
2nd Class : Nil.

**Pass Class**

J. G. Modh, N. C. Parikh, V. S. Ghadgay.

**Passed in Co-operation Group only.**

B. G. Doshi, D. M. Patil, P. G. Thakkar, P. P. Bawale, S. T. Bhide, N. S. Karanjkar, B. A. Naik, J. A. Patel, H. D. Patil, R. S. Patil, S. G. Pathak, H. G. Ranade, C. J. Upadhye, V. N. Vani.

**Passed in Accountancy Group only.**

V. G. Patel.

**Passed in Banking Paper only.**

Nil

**The following candidates have also secured exemption at detailed below**

| | | |
|---|---|---|
| G. M. Shah | II & III | Co-operation Group |
| P. N. Chirmade | II & III | - do - |
| B. N. Kadam | II & III | - do - |
| A. A. Kathiria | V & VII | Accountancy Group |
| C. P. Shirke | V & VI | - do - |
| N. Y. Shrigondekar | V & VI | - do - |

**A. U. SHAIKH,**
Registrar,
Co-operative Societies, B. S., Poona.
and
Chairman, Co-operation and
Accountancy, Diploma Board, Poona 1.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८११ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.